# वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयामधुन विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा : एक अभ्यास

**डॉ. धाकड योगिनी पद्माकर**

*ग्रंथपाल,*

*आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपुर जि.धुळे*

**प्रस्तावनाः—**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी भारत सरकारने डिसेंबर 1953 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केली व 1956 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाला कायदेशीर संस्था म्हणून मान्यता प्राप्त झाली.महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयांच्या विकासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने भरघोस आर्थिक मदत तर केलीच शिवाय वाचनसाहित्य, उपकरणे, फर्निचर खरेदीसाठी व ग्रंथालय इमारत बांधण्यासाठी देखील अनुदान दिले.

महाविद्यालयीन शिक्षणात किंबहुना शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयांना अनन्य साधारण महत्व आहे. हे नव्याने सांगायला नकोच आहे. विद्यापीठ अनुदान आयोगनॅक च्या माध्यमाने केल्या जाणा—या महाविद्यालयांच्या मूल्यांकनात ग्रंथालयासाठी ठेवलेले गुण, राधाकृष्ण आयोग, कोठारी कमीशन इ. च्या अमंलबजावण्या व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या ग्रंथालयाविषयी उगम पावलेल्या स्वंतत्र ज्ञानशाखेने शिक्षणातील व समाजातील ग्रंथालयाचे महत्व सिध्द केले आहे.

परंतु आज आवश्यकता आहे ती ग्रंथालयांच्या मुल्यमापनाची महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये त्यांच्या उद्दिष्टांनुरुप कार्य करित आहे किंवा नाही तसेच ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.रंगनाथन यानी 1926 मध्ये ग्रंथालयशास्त्राचे पाच महत्वाचे सिध्दांत मांडले त्या सिध्दातांची आज महाविद्यालयात किती प्रमाणात अमंलबजावणी होत आहे हे तपासण्याची गरज आहे. नवीन तंत्रज्ञान स्विकारुन ग्रंथालयातील सेवक विदयार्थी किंवा वाचकांना अधिक प्रभावीपणे सेवा देत आहे कि नाही,अध्ययन व अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यात ग्रंथालयाचा सहभाग किती आहे. संशोधनाचा वेग आणि गुणवत्ता वाढविण्यात ग्रंथालय काय भूमिका घेत आहे यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. तसेच शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयामधुन पुरविल्या जाणा—या सेवांचा तुलनात्मक अभ्यासया रिसर्च पेपरच्या माध्यमाने उहापोह केला आहे.

ज्यामुळे ग्रंथपालांना त्याचे ज्ञान होऊन आपल्या ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे योग्य रितीने जमते. आधुनिक युगात वाढत्या ग्रंथसंपदा तसेच ज्ञानाला माहिती तंत्रज्ञानाव्दारे ग्रंथालयात आणता येते . तसेच त्याव्दारे वाचकांपर्यत कमी वेळात पोहचवता येते.महाविद्यालयीन ग्रंथालयांचे संगणकीकरण केल्याने त्याचा सर्वात मोठा फायदा हा वाचक, विदयार्थी,संशोधक,प्राध्यापक या सर्वांना होतो.

**संशोधनाचे महत्व :—**

महाविद्यालयात येणारा विद्यार्थी हा कुमार अवस्थेत नुकताच पदार्पन केलेला असतो.महाविद्यालयातील नाविण्याने भरलेल्या वातावरणात त्यांची जिज्ञासापुरती वेध घेत असते. या वयातच त्यांचा पाठयपुस्तका बाहेरील ज्ञानाशी संबंध येतो. असा संदर्भ ज्ञानासाठी विज्ञानासाठी विद्यार्थ्यातूनच भावी आदर्श नागरिक तयार होत असतो. त्यांना सुसंस्कृत घडविण्याचे कार्य हे ग्रंथालय करित असते. विद्यार्थी, प्राध्यापक तसेच संशोधकांना त्यांच्या कार्यात वेळोवेळी मदत करणे हे ग्रंथालयाच्या ध्येयपूर्तीसाठी ग्रंथालयांना पूर्णपणे समृध्द असणे गरजेचे आहे. या

ग्रंथालयातून जगातीलज्ञान तसेच चालू घडामोडी , दैनंदिन वर्तमानपत्र विविध मासिके समृध्द ग्रंथसंपदेबरोबरच त्यांना पुस्तकाची देवाण.घेवाण अधिक सोयीची करता येते.

प्रस्तुत संशोधनाने शिरपूर शहरातील वाचकांबरोबर बाहेरील वाचकांनाही महाविद्यालयांच्या ग्रंथालयाची संपूर्ण माहिती होइल . इतर महाविद्यालयातील तसेच शहरातील नागरिकांना महाविद्यालयातील ग्रंथालयांमध्ये आधुनिक यंत्रसामुग्रीवर चालणा–या अनेक सेवा; उदा. प्रतिलिपी सेवाद्धव त्याविषयीची माहिती लक्षात येण्यास उपयुक्त ठरेल. तसेच संगणक चा वापर व त्याव्दारे देण्यात येणा–या सेवा या सर्वाच्या वापरामुळे ग्रंथालयाचे महत्व इतरांना कळण्यास फायदेशीर ठरते. विद्यार्थी , वाचक, प्राध्यापक, संशोधक इत्यादींना प्रस्तुत संशोधन हया विषयावरील पुढील संशोधनास मार्गदर्शक ठरणार आहे. वाचकांना याव्दारे आपल्या जवळील ज्ञान भंडाररुपी महाविद्यालयीन ग्रंथालयाचे आधुनिकीकरणास येणा–या अडचणी समजतील आणि ग्रंथालय विकासासाठी हातभार लावण्यास जरुर मदत होईल.

या संशोधनामुळे संगणिकृत झालेल्या ग्रंथालयामुळे ग्रंथालयातील बदललेल्या सेवांचा तुलनात्मक अभ्यास हा चांगल्या प्रकारे करता येईल शिवाय ग्रंथालयात येणा–या समस्या, ग्रंथालयाचे फायदे व तोटे यांची जाणीव इतरांना व ग्रंथपालांना ही होणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :–**

1) शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयांसाठी ग्रंथालयातील सेवा सुविधांचा आढावा घेणे.
2) महाविद्यालय ग्रंथालयातील वाचन साहीत्य संग्रहाचा अभ्यास करणे .
3) महाविद्यालय ग्रंथालयातील संगणकीय सेवा सुविधांचा अभ्यास करणे.
4) महाविद्यालय ग्रंथालयाकडून पुरविल्या जाणा–या सेवा सुविधांचा तौलनिक अभ्यास करणे .
5) महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील सेवा सुविधा देतांना येणा–या अडचणींवर उपाय सुचविणे .

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :–**

प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयामधुन पुरविल्या जाणा–या सेवांचा तुलनात्मक अभ्यास विषयी संपूर्ण माहिती देण्यात येणार आहे. शिरपूरतालुक्याच्या शैक्षणिक प्रगतीत महत्वाचे कार्य करणा–या विविध शाखांच्या महाविद्यालयातील ग्रंथालयांतून वाचक, अध्यापक, विदयार्थी, संशोधक इ. देण्यात येणा–या सर्व सेवा यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. शिरपूर तालुक्यातील एकूण 04 महाविद्यालयांचा या शोधनिबंधात विचार केला जाईल. संशोधनासाठी कालखंडाची निश्चित करणे आवश्यक आहे. म्हणून महाविद्यालयाच्या स्थापनेपासून विचार केला जाणार नाही.

**संशोधन पध्दती** :–सदर प्रकल्पात वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**संशोधन तंत्रे व साधने** :–सदर प्रकल्पासाठी संशोधन तंत्र म्हणून पाहणी तर माहिती साधन म्हणून संशोधकाने प्रश्नावलीचा उपयोग केलेला आहे.

**विषय विवेचन :–**

सदर शोधनिबंधाचा विषय हाशिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयामधुन पुरविल्या जाणा–या सेवांचा तुलनात्मक अभ्यासअसा आहे. या तालुक्यात एकूण चार महाविद्यालयांची संख्या आहे. सदर शोध

निबंधासाठी आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली तयार केली व खालील महाविद्यालयातील विभागातील माहिती संकलित केलेली आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| 1 | एच.आर.पटेल कला महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे | 1990 |
| 2 | आर. सी. पटेल कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे | 1991 |
| 3 | एस.पी.डी.एम.कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय शिरपूर जि.धुळे | 1962 |
| 4 | कै .पी .एस .वाडीले कला महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 2001 |

वरील महाविद्यालयाच्या खालील विभागातुन माहिती संकलित केलेली आहे.

1. सर्वसाधारण माहिती
2. ग्रंथालय कामकाज वेळ
3. ग्रंथालय उत्पनाचे साधने
4. ग्रंथसंग्रह
5. ग्रंथउपार्जन व तांत्रिक प्रक्रिया
6. संगणकीकरण
7. ग्रंथालय सेवक
8. ग्रंथालय सेव
9. ग्रंथालय सहकार

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

खालील तक्यात प्रत्येक महाविद्यालयाच्या कला,वाणिज्य,विज्ञान या शाखेप्रमाणे वाचकांची संख्या दिली आहे

**सर्वसाधारण माहिती**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | कला | वाणिज्य | विज्ञान | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एच.आर.पटेलकॉलेज, शिरपुर | 28 | — | — | 28 |
| 2 | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | 17 | 8 | 14 | 39 |
| 3 | एस.पी.डी.एम.कॉलेज, शिरपुर | 06 | 11 | 17 | 34 |
| 4 | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 24 | — | — | 24 |

**ग्रंथालयाला विद्यार्थी/ वाचक केव्हा भेट देण्याचा कालावधी**

| अ. न. | महाविद्यालयाचे नाव | दररोज | आठवडयातून | महिन्यातून | एकूण | ग्रंथालयाचा उपयोग करता का | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | होय | नाही |
| 1 | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | 14 | 17 | 01 | 32 | 27 | — |
| 2 | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | 31 | 06 | 01 | 38 | 39 | — |
| 3 | एस.पी.डी.एम.कॉलेज, शिरपुर | 06 | 21 | 02 | 29 | 31 | 02 |
| 4 | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 04 | 18 | 04 | 26 | 25 | — |

**ग्रंथालयाची वेळ**

| अ. क. | महाविद्यालयाचे नाव | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | 25 | 02 | 27 |
| 2 | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | 34 | 04 | 38 |
| 3 | एस.पी.डी.एम.कॉलेज, शिरपुर | 21 | 11 | 32 |
| 4 | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 03 | 22 | 25 |
| | एकुण | | | 122 |

**ग्रंथालयास भेट देण्याचा हेतू**

| अ. क. | पर्याय | एच.आर. पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी. पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी. एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नवीन व जुने ग्रंथ–शोधण्यासाठी | 06 | 10 | 04 | 15 | 35 |
| 2 | आपल्या विषयावरील पुस्तके,संदर्भ ग्रंथ वाचण्यासाठी | 15 | 28 | 19 | 08 | 70 |
| 3 | एखाद्या विषयावर माहिती मिळविण्याकरीता | 09 | 11 | 02 | 04 | 25 |
| 4 | सेमीनार/प्रकल्प अहवाल साठी संदर्भ करीता | 04 | 04 | 01 | 03 | 12 |
| 5 | वर्तमान पत्र किंवा इतर वाचन साहित्याची माहिती मिळविण्यासाठी | 10 | 09 | 08 | 07 | 34 |

**विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा–या सेवा**

| अ. क. | पर्याय | एच. आर. पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेरता. शिरपूर जि.धुळे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुस्तक पेढी | 22 | 29 | 29 | 24 | 104 |
| 2 | प्रकल्प अहवाल | 02 | 01 | 03 | 04 | 10 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | संदर्भ सेवा | — | 04 | — | 03 | 07 |
| 4 | झेरॉक्स सेवा | — | 03 | — | — | 03 |
| 5 | नवीन साहित्याची उपलब्ध सूची | 01 | 17 | 02 | 02 | 22 |
| 6 | आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा | 01 | 11 | — | 06 | 18 |
| 7 | इंटरनेट सेवा | 05 | 24 | — | 02 | 31 |
| 8 | प्रतिलिपी सेवा | 02 | 03 | — | 01 | 06 |

**ग्रंथालयात विद्यार्थ्यांना दिल्या जाणा–या सेवा**

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | ग्रंथालयात प्रतिलिपी सेवा उपलब्ध आहे काय | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| 1 | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | 12 | 15 |
| 2 | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | 26 | 13 |
| 3 | एस.पी.डी.एम.कॉलेज, शिरपुर | 12 | 19 |
| 4 | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 03 | 22 |
| एकूण | — | **53** | **69** |

**ग्रंथालयात विद्यार्थ्यांना दिल्या जाणा–या सेवा**

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम विषयक आणि इतर वाचन साहित्याची माहिती मिळते काय | | ग्रंथालयातीलसंग्रहाबाबत समाधानी आहात काय | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही |
| 1 | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | 26 | 01 | 22 | 04 |
| 2 | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | 34 | 04 | 34 | 04 |
| 3 | एस.पी.डी.एम.कॉलेज, शिरपुर | 23 | 09 | 16 | 17 |
| 4 | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 14 | 11 | 11 | 14 |
| एकूण | | **97** | **25** | **83** | **39** |

वाचन साहित्या बद्दल आपले मत

| अ. क्र. | महाविदयालयाचे नाव | ग्रंथालयात सध्या उपलब्ध वाचन साहित्य आपल्या आवश्यक गरजा पूर्ण करता काय ? | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| 1 | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | 23 | 04 |
| 2 | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | 30 | 06 |
| 3 | एस.पी.डी.एम.कॉलेज, शिरपुर | 24 | 10 |
| 4 | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 05 | 20 |

नियतकालिकांची पसंती

| अ. क. | पर्याय | एच.आर. पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय | 21 | 26 | 32 | 24 | 103 |
| 2 | आंतरराष्ट्रीय | 09 | 06 | 03 | 01 | 19 |
| एकूण | — | — | — | — | — | **122** |

इतर वाचन साहित्याबाबत माहिती

| अ. क. | महाविदयालयाचे नाव | विषयाव्यतिरिक्त ग्रंथालयात नियतकालिके इतर येतात काय ? | | संदर्भ ग्रंथ व इतर वाचन साहित्य उपलब्ध होते काय ? | | ग्रंथालयात येणारी वर्तमान पत्रे आपण वाचता काय ? | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही | होय | नाही |
| 1 | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | 22 | 05 | 26 | 01 | 23 | 02 |
| 2 | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | 32 | 06 | 30 | 06 | 31 | 06 |
| 3 | एस.पी.डी.एम.कॉलेज, शिरपुर | 21 | 11 | 24 | 10 | 31 | 01 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे | 04 | 21 | 13 | 12 | 13 | 12 |

वर्तमानपत्रांची माहिती

| अ. क. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि. धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 27 | 32 | 92 | 24 |
| 2 | हिंदी | 24 | 19 | 01 | 02 |
| 3 | इग्रंजी | 26 | 18 | 04 | 02 |
| एकूण | | 77 | 69 | 57 | 28 |

पुस्तके मागविण्यासाठी

| अ. क. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्राचार्य | 12 | 02 | 03 | 03 |
| 2 | ग्रंथपाल | 13 | 25 | 21 | 23 |
| 3 | प्राध्यापक | 01 | 03 | 02 | 02 |
| 4 | कोणाकडेच नाही | 02 | 07 | 05 | – |
| **एकूण** | | **28** | **35** | **31** | **28** |

ग्रंथालयीन सेवा :–

सदर्भ साहित्याविषयी

| अ. क. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | होय | 11 | 29 | 17 | 14 |
| 2 | नाही | 16 | 08 | 15 | 11 |

संदर्भ साहित्य उपलब्ध ते विषयी

| अ.क्र. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | होय | 24 | 32 | 11 | — |
| 2 | नाही | 03 | 05 | 21 | 25 |
| एकूण | | **27** | **35** | **32** | **25** |

अभ्यासिकेची वेळ

| अ.क्र. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | होय | 23 | 34 | 15 | 03 |
| 2 | नाही | 04 | 04 | 17 | 22 |
| एकूण | | **27** | **38** | **32** | **25** |

परिक्षेच्या काळात अभ्यासिके बाबत

| अ.क्र. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | होय | 22 | 35 | 17 | 06 |
| 2 | नाही | 05 | 01 | 16 | 19 |
| एकूण | | **27** | **36** | **33** | **25** |

वाचन साहित्य पुरविण्याविशयी

| अ.क्र | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | होय | 22 | 33 | 24 | 20 |
| 2 | नाही | 04 | 04 | 08 | 05 |
| एकूण | | **26** | **37** | **32** | **25** |

**ग्रंथेतर साहित्य सुविधा :–**

**आज्ञावलीचा वापराव्दारे होणारे फायदे**

| अ. क. | पर्याय | एच.आर. पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वेळेची बचत | 27 | 06 | 10 | 11 |
| 2 | कमीत कमी मनुष्य बळाचा वापर | 32 | 03 | 06 | 12 |
| 3 | कामात अचुकता | 22 | 02 | 04 | 05 |
| 4 | नवीन तंत्रज्ञानाशी ग्रंथालयाचा मेळ बसविणे | 21 | 03 | 03 | 01 |
| **एकूण** | | **57** | **53** | **33** | **25** |

**आज्ञावलीच्या वापरासाठी आवश्यक गोष्टींबाबत**

| अ. क. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विदयुत पुरवठा | 22 | 15 | 15 | 02 |
| 2 | संगणक | 12 | 14 | 09 | 22 |
| 3 | इंटरनेट | 12 | 29 | 15 | 04 |
| **एकूण** | | **46** | **58** | **39** | **28** |

**इंटनेटच्या सुविधेबाबत**

| अ. क. | पर्याय | एच.आर.पटेल कॉलेज, शिरपुर | आर.सी.पटेल कॉलेज, शिरपुर | एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपुर | वाडीले महाविद्यालय, थाळनेर ता. शिरपूर जि.धुळे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मोफत | 24 | 38 | 19 | 05 |
| 2 | मुल्यदेऊन | 04 | 00 | 10 | 22 |
| एकूण | | 28 | 38 | 29 | 27 |

**संशोधनातून काढलेले निष्कर्श :–**

1. चार ही ग्रंथालयात ग्रंथालयाकडून त्रोटक सेवा पुरविल्या जातात.

2. चार ही ग्रंथालयात ग्रंथालय समिती आहेत परंतु विदयार्थी प्रतिनिधींचा समावेश दोन ग्रंथालयात करण्यात आलेला नाही.
3. ग्रंथालयातील ग्रंथ संग्रह वाचकांच्या तुलनेने पुरेसा नाही.तसेच ग्रंथेतर साहित्य आणि साधन सामुग्री नाही.
4. तीन ग्रंथालयांची स्वतंत्र इमारत नाही आहे फक्त एकच ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत आहे.
5. वाचक हे ग्रंथालयातील ग्रंथावर अवलंबून आहेत.
6. फक्त दोनच ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे.
7. कोणत्याही ग्रंथालयात मुक्तव्दार पध्दत नाही.
8. ग्रंथालयात वाचकांना आंतरग्रंथालयीन सेवा मिळत नाही.
9. अभ्यासिकेची वेळ फक्त महाविदयालयाच्या वेळे प्रमाणेच आहे.
10. ग्रंथालयांकडून पुरेस्या सेवा दिल्या जात नाही.
11. ग्रंथालयासाठी उपलब्ध जागा पुरेसी नाही
12. ग्रंथालयात ग्रंथालयीन सेवकांची संख्या पुरेसी नाही
13. दोन ग्रंथालयात तालिकीकरण झालेले नाही.
14. वाचकांना प्रतिलिपी सेवा देण्याकरिता कमीत कमी झेरॉक्स मशीन असणे अत्यंत जरुरीचे आहे.
15. इंटरनेट सारखी अत्याधुनिक सेवा वाचकांना उपलब्ध करुन दिली जात नाही.

**<u>संदर्भ सूची</u>**

1. मुळे आणि उमाटे,शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,नागपूर : महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ,1988
2. जोशी,प्र.ण. आदर्श मराठी शब्दकोश पुणे : विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,1986
3. आगलावे,प्रदिप .संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे नागपूर : विदया प्रकाशन,2000
4. नाड बोंडे,गुरुनाथ सामाजिक संशोधन पध्दती कोल्हापूर : फडके प्रकाश,1986
5. कुंभोजकर,ग.वि. संशोधन पध्दती व संख्या शास्त्र कोल्हापूर : फडके प्रकाशन, 1989
6. भांडारकर,पू.ल.सामाजिक संशोधन पध्दती नागपूर : महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथनिमिर्ती मंडळ,1987
7. महाराष्ट्र सरकार,महाराष्ट्रातील जिल्हे : धुळे,मुंबई, 1961
8. बापट,भावगो. शैक्षणिक संशोधन पुणे : नूतन प्रकाशन,1986
9. खान्देश संस्कृती ;पुरवणी–सकाळ,15 ऑगस्ट 2002,धुळे आवृत्ती.
10. पाटकर विवेक, ग्रंथालयाचे संगणकिकरण व्याप्ती व आव्हाने,मैत्रिच्या पलीकडे,जुलै 2001
11. Busha, Chales H. and Stephen P.Harter- Research method in Librarianship, New York: Academic Press, 1980.
12. कुभांर राजेंद्र,महाविदयालयीन व विदयापीठ ग्रंथालये,नाशिक य.च.म.मु.वि.,2002
13. Kual, H.K. "Library and Information Professional In the 21 st Century "University News .May 11 1998.
14. सातारकर ,सु.प्र. सकल गुणवत्ता व्यवस्थापनाचा ग्रंथालयाकरीता उपयोग,ज्ञानगंगोत्री.जून. जुलै,ऑगस्ट 2001.